



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जी इच्छा मनातून आणि शुद्ध अंतकरणातून निघत असते व जे खूप तीव्र देखील असते, त्यात खूपच जास्ती सकारात्मक ऊर्जा समाविष्ट असते...

- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम


वर्ष : ०५ | अंक : ६६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२० ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## साई संस्थानच्या ४७ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, अहिल्यानगर :** साईबाबा मंदिराच्या साईआश्रम भक्तनिवासातील विद्युत विभागात लाखो रूपयांचा अपहार केल्याप्रकरणी शिर्डी च्या साई संस्थानम धील ४७ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर न्यायालयाच्या आदेशानंतर शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २०२२ साली सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी याचिका दाखल केली होती.

शिर्डीच्या साई संस्थान प्रशासनात धक्कादायक प्रकार समोर आला आहे. साईबाबा संस्थानच्या साईआश्रम भक्तनिवासातील विद्युत विभागात आसलेल्या साहित्याची परस्पर विक्री करून ७७ लाखांची लुट केली गेलीय. साईबाबा संस्थानने याविरोधात कोणतीही कारवाई न केल्याने सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील औरंगाबाद हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. खंडपिठाने आदेश दिल्यानंतर अधिकाऱ्यांसह ४७ जणांवर शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

**या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर आरोप...**

खाडगीर बि.डी विद्युत पर्यवेक्षक नामदेव रामचंद्र जाधव, बाळासाहेब केशव सावंत, वसंत दामोदर गाडेकर, साहेबराव पांडुरंग लंके, प्रशासकीय अधिकारी अशोक रंभाजी औटी, रवी सतीश घुले, रघुनाथ भागाजी आहेर, संजय मधुकर जोरी, विजय गणपतराव रोहमारे, राजेंद्र सोपान जगताप, प्रकाश नाना अभंग, राहुल मदन इंगवले ,सुनील काशिनाथ धरम, एन आर शेख, दीपक शिवाजी तुरकने, राजेंद्र मोहनराव बोठे, आउट सोर्स कर्मचारी साईनाथ इनामके, महेश मुंढरे, स्वप्नील जोंधळे, प्रमोद शंकरराव चिने, किशोर एकनाथ महाले, उमाकांत तुपे, बाळू कृष्णाराव कुलकर्णी, अरुण गणपत जाधव, संजय बाळासाहेब बनसोडे, सागर रमेश जगताप, संजयकुमार एकनाथ हरणे, शरद बाबासाहेब मते, महेश मोढे, सागर खामकर, रामनाथ लक्ष्मण वाकचौरे, सोमनाथ साहेबराव पाचेरे, विक्रम सुरेश देवकर, सुभाष नामदेव लांडगे ,महेश विठ्ठल गोंदकर ,भानुदास दादा बावके ,विलास भागुनाथ जेजुरकर, सागर ठोंबरे, गोरक्षनाथ आप्पा काळे, सुनील पुंडलिक वाघ, विलास रघुनाथ भावसार, अनिल नामदेव वाणी, सर्जेराव मच्छिंद्र गोरे, पाराजी चांगदेव वाणी,साईनाथ परसराम आव्हाळे,योगेश रामचंद्र रोहम, यांच्यावर भारतीय दंड विधान कलम ३७९ ३८१ ४०८ ४९ ४६५ ४६७ ४७१ १२० ब प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## वरळी झोपडपट्टीत भीषण आग !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, मुंबई :** वरळीच्या महाकाली भागात सिलेंडरचा स्फोट होऊन झोपडपट्टीला भीषण आग लागली आहे. या आगीत अनेक झोपड्यांचे मोठं नुकसान झाले आहे. मात्र या कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. दिवाळीच्या तोंडावर ही घटना घडल्याने परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. अग्निशमन दल घटनास्थळी असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत अशी माहिती समोर आली आहे.महाकाली झोपडपट्टीत लागली आगसमोर आलेल्या माहितीनुसार, वरळी सीफेस परिसरातील महाकाली झोपडपट्टीत ही आग लागली आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरु आहे. शॉर्ट सर्कीट मुळे सुरुवातीला आग लागल्याची माहिती मिळाली आहे, त्यानंतर दोन सिलेंडरचा स्फोट झाल्याची माहिती मिळाली आहे. सध्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू आहे. सध्या घटनास्थळी पोलील, अग्निशामक दलाचे जवान आणि अधिकारी, बीएमसीचे अधिकारी हजर आहेत. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी सर्वजण प्रयत्न करत आहेत.आमदार सुनील शिंदे काय म्हणाले?शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे आमदार सुनील शिंदे यांनी या आगीबाबत माहिती देताना म्हटले की, 'आदित्य ठाकरे साहेबाचा फोन आलेला होता. आगीच्या ठिकाणी लोकांना मदत करण्यास सांगितलं आहे. ज्या घरात आग लागली, त्या घरातील लोक साईबाबाच्या पालखीला गेले होत. साईबाबांच्या कृपेनं पालखीला गेले होते ते वाचले आहेत. अग्निशामक दलानं आगीवर नियंत्रण मिळवलेलं आहे.'अनेक झोपड्या जळून खाकमहत्त्वाची बाब म्हणजे या आगीत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त अद्याप आलेले नाही. मात्र या घटनेत अनेक झोपड्या जळून खाक झाल्या आहेत. दिवाळीच्या तोंडावर ही आगीची घटना घडल्याने घर मालकांवर मोठा डोंगर कोसळला आहे. दरम्यान याआधीही मुंबईत आगीच्या अनेक घटना घडल्या होत्या. यातील काही घटनांमध्ये जीवीतहानी तर काही घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली होती.

## भारताचा सलग तिसरा पराभव

**दि.१९ :** वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत इंग्लंडने भारताचा ४ धावांनी पराभव केला.. यासह इंग्लंडने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आता भारतासाठी न्यूझीलंड विरुद्धचा सामना खूपच महत्त्वाचा असणार आहे. या सामन्यात भारताने विजय मिळवला तर उपांत्य फेरीच्या आशा कायम राहतील. भारताचे या स्पर्धेत दोन सामने शिल्लक आहे. एक न्यूझीलंड आणि दुसरा बांगलादेशविरुद्ध हे दोन्ही सामने जिंकावे लागतील. पण न्यूझीलंडविरुद्धचा सामना करो या मरोची लढाई असेल. दरम्यान, इंग्लंडने २८८ धावा केल्या आणि भारतासमोर विजयासाठी २८९ धावांचं आव्हान ठेवलं होतं. या बलाढ्य आव्हानाचा सामना करतानाभारतीय फलंदाजकाय करणार याची उत्सुकता लागून होती. मधल्या फळीत भारतीय फलंदाजांनी डाव सावरला पण त्यानंतर गडगडला. भारताला ५० षटकात ६ गडी गमवून २८४ धावा करता आल्या. हा सामना भारताने ४ धावांनी गमावला. विजयी धावांचा पाठलाग करताना संघाच्या १३ धावांवर प्रतिका राऊल अवघ्या ६ धावा करून बाद झाली. त्यानंतर स्मृती मंधानाने हरलीन देओलसोबत डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पण २९ धावांची भागीदारी झाल्यानंतर हरलीन देओल २४ धावा करून बाद झाली. त्यानंतर उपकर्णधार स्मृती मंधाना आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी डाव सावरला. तिसऱ्या विकेटसाठी या १२५ धावांची भागीदारी केली. हरमनप्रती कौर ७० धावा करून बाद झाली. स्मृती मंधाना आणि दीप्ती शर्मा यांनी डाव पुढे नेला. या दोघांनी ६७ धावांची भागीदारी केली. स्मृती मंधाना ८८ धावा करून बाद झाली. त्यानंतर दीप्ती शर्माने डाव सावरला आणि ५७ चेंडूत ५० धावा केल्या आणि बाद झाली. त्यामुळे संघ अडचणीत आला. रिचा घोषही काही खास करू शकली नाही. ८ धावा करून तंबूत आली.

# १ नोव्हेंबरला निवडणूक आयोगाविरोधात मुंबईत विराट मोर्चाची घोषणा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत, मनसे नेते बाळा नांदगावकर, राष्ट्रवादी एसपीचे नेते जयंत पाटील, मनसे नेते नितीन सरदेसाई, मनसे नेते संदीप देशपांडे, काँग्रेस नेते सचिन सावंत यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांची आज मुंबईत दादरच्या शिवसेना भवन येथे पत्रकार परिषद पार पडली.



यावेळी खासदार संजय राऊत यांनी सुरुवातीला भूमिका मांडली. यावेळी संजय राऊत यांनी मोठी घोषणा केली. येत्या १ नोव्हेंबरला महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांचा निवडणूक आयोगाच्या विरोधात मुंबईत विराट मोर्चा निघेल, अशी मोठी घोषणा संजय राऊत यांनी केली.

निवडणूक स्वच्छ, पारदर्शक असायला हवी यासाठी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख प्रादेशिक पक्ष (सत्ताधारी वगळून) लढत आहेत. दोन दिवस सातत्याने निवडणूक आयोगाकडे बैठका झाल्या. त्या बैठकांमध्ये सर्व पक्षांचे प्रमुख नेते होते. आमच्या प्रमुख नेत्यांनी बैठकीत जे मुद्दे मांडले ते निवडणूक आयोग मानायला तयार नाही. निवडणूक आयोगाने गुन्हेगारी स्वरुपाचं कृत्य केलं आहे. ते ऐकत नसल्याने सर्वांचं एकमत झालं आहे, त्यांना रस्त्यावर उतरुन दणका द्यावा लागेल, असा इशारा राऊतांनी दिला.

येत्या १ नोव्हेंबरला शनिवारी निवडणूक आयोगाच्या या मनमानी आणि भ्रष्ट कारभारा विरुद्ध मुंबईत सर्वपक्षीय विराट मोर्चा निघेल. महाराष्ट्राच्या गावागावातून, जिल्ह्या-जिल्ह्यातून मतदानाचा अधिकार गमावलेले लाखो लोक इथे येतील आणि मतदारांची ताकद देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री आणि निवडणूक आयोगाला दाखवली जाईल. या मोर्चाचं नेतृत्व ज्येष्ठ नेते शरद पवार, शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मविआतील इतर नेते करतील. त्या दृष्टीने पुढील पावलं टाकली जातील. आज ही पत्रकार परिषद फक्त तारीख जाहीर करण्यासाठी घेतली आहे. अजून एक महत्त्वाची पत्रकार परिषद होईल, अशी महत्त्वाची माहिती संजय राऊत यांनी दिली.

**संजय राऊत काय-काय म्हणाले?**

आज सगळ्यांनी एकत्र येणं गरजेचं होतं. गेल्या काही दिवसांपासून निवडणूक आयोगाच्या घोटाळ्याबाबत महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्ष लढाई लढत आहोत. ही लढाई आम्ही दिल्लीत काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात लढतोय. त्यानंतर आता महाराष्ट्रात ही लढाई सुरु झाली आहे. त्यातून काय निष्पन्न होईल त्या विषयी शंका आहे. आजच मनसेचा फार मोठा मेळावा पार पडला. या मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दोन महत्त्वाचे मुद्दे मांडले. त्यांनी सांगितलं की मतदान करा किंवा करु नका, असं संजय राऊत म्हणाले.

निवडणुकीचं मॅच फिक्सिंग झालेलं आहे. या मॅच फिक्सिंग विरुद्ध आपली लढाई आहे. महाराष्ट्राच्या यादीत ९६ लाख बोगस मतदार आहेत. म्हणजेच जवळपास १ कोटी मतदार, हे मतदार आमच्या मते घुसखोरच आहेत. या घुसखोरांना यादीतून बाहेर काढणं ही लोकशाहीची गरज आहे. कालच देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीत एका कार्यक्रमात सांगितलं की, आम्ही घुसखोरांना शोधू आणि त्यांची नावे मतदार यादीतून बाहेर काढू. हे देशाच्या गृहमंत्र्यांचं वक्तव्य आहे आणि ते निवडणूक कार्यक्रमाचे प्रमुख असतात. आमचं त्यांना आवाहन आहे, महाराष्ट्राच्या निवडणूक यादीत घुसलेले १ कोटी मतदारांना बाहेर काढा आणि या मोहीमेला महाराष्ट्रातून सुरुवात करा, असं राऊत म्हणाले.

पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी जाहीर व्यासपीठावरुन सांगितलं की, माझ्या निवडणुकीला २० हजार मतदार बाहेरुन आणले आणि मी जिंकून आलो. दुसरं म्हणजे बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांचंदेखील महत्त्वाचं वक्तव्य आहे. त्या म्हणतात, यापूर्वी मी लढवलेल्या सर्व निवडणुकांमध्ये पूर्वी बोगस आणि दुबार मतदारांची यादी निवडणूक आयोगाला दिली होती. पण ती नावे कधीच कमी झाली नाहीत. अनेक ठिकाणी अधिकारी आणि कर्मचारी पैसे घेऊन बोगस मतदारांची नोंद घेतात, असं सत्ताधारी पक्षाच्या आमदार सांगत आहेत. ऐरोली विधानसभा मतदारसंघात ४१ हजार आणि बेलापूरमध्ये ३५ हजार दुबार आणि बोगस मतदार आहेत हे सत्ताधारी पक्षाचे आमदार सांगत आहेत, अशी माहिती संजय राऊत यांनी दिली.

बुलढाणामध्ये सत्ताधारी पक्षाचे आमदार संजय गायकवाड सांगत आहेत की थेट १ लाखांपेक्षा जास्त बोगस मतदार निवडले गेले. याचा अर्थ लोकसभा निवडणुकीत जो त्यांचा खासदार बोगस मतदारांच्या मदतीने जिंकला आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात मतांमध्ये घोटाळा करुन ते सत्तेवर येत आहेत. मतदार याद्या पवित्र आणि स्वच्छ असायला हव्यात यासाठी हा संघर्ष आहे, असं ते म्हणाले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा, 'सोलरच्या माध्यमातून मोफत वीजपुरवठा'

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, नागपूर :** 'प्रत्येक गरजू अनुसूचित जाती-जमातीच्या घराला सोलरची सुविधा उपलब्ध करून देत त्यांना मोफत वीजेचा लाभ मिळवून देण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. अनुसूचित जाती-जमातीसह हळूहळू ओबीसी तसेच प्रधानमंत्री आवास योजनेतील सर्व लाभार्थ्यांना याद्वारे मोफत वीजपुरवठा होणार आहे,' अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केली. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नागपूरतर्फे जिल्ह्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ई-रिक्षा वाटप कार्यक्रमाचे आयोजन हनुमाननगरातील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

मंचावर महसूलमंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री आशीष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार डॉ. आशीष देशमुख, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार मोहन मते, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार संजय मेश्राम, राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आदींची उपस्थिती होती. या उपक्रमाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील एकूण ५५५ गरजू दिव्यांग लाभार्थ्यांना ई-रिक्शा, मोटराइज्ड ट्रायसिकल, ई-किराणा रिक्षा, ई-भाजीपाला रिक्षा, फूड कार्टचे वाटप करण्यात आले.

तसेच या कार्यक्रमात 'घर-घर संविधान' या उपक्रमांतर्गत संविधान प्रास्ताविकेचे वाटप आणि कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत जमिनीचे ७/१२ उतारे वाटप कॉफी टेबल बुक, चॅटबोट आणि ॲडव्हेंचर पार्कचे उद्घाटन झाले. उपस्थितांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले,'दिव्यांगाना स्वावलंबी-आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने आज पाउल टाकण्यात आले आहे. ज्या मांग-गारुडी समाजाकडे स्वत:च्या जातीचे पुरावे नव्हते. त्यांच्यासाठी विशेष शिबिर घेऊन त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले असून आज घरकुल वाटप योजनेचा लाभ मिळत आहे. राज्यात आतापर्यंत २५ लाख लखपती दीदी तयार झाल्या असून लवकरच हा आकडा ५० लाखांवर पोहचणार आहे. येत्या काळात १ कोटी लखपती दीदी तयार व्हाव्यात असा सरकारचा मानस आहे.' तत्पूर्वी, राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी आशा आणि अंगणवाडी पर्यवेक्षिकांना मोटरसायकल देण्याची मागणी केली. तिला मुख्यमंत्री फडणवीस यांनी लागलीच मंजुरी देत याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. प्रास्ताविक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले. निवेदन रेणुका देशकर यांनी केले.

**१ हजार महिला बचतगटांना आर्थिक सहाय्य**

नागपूर जिल्ह्यातील १ हजार महिला बचतगटांना प्रत्येक १ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. तसेच २.५ एकर जागा देऊन तिथे चारा आणि बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. जिल्ह्याच्या विकासासाठी एकूण १२०० कोटी देण्यात आले असून २०२९, २०३५ आणि २०४७ मध्ये जिल्हा कशा स्वरूपात प्रगती करेल याचे नियोजन झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

## 'शनिवारवाडा परिसरातील मजार हटवा, भगवा झेंडा फडकवू द्या', हिंदूत्ववादी संघटना आक्रमक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, पुणे :** पुण्यातील शनिवारवाडा परसिरात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. शनिवारवाडा परिसरात नमाज पठण झाल्याचा आरोप भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी केला. मेधा कुलकर्णी यांनी याबाबतचे व्हिडीओदेखील शेअर केले. यानंतर मेधा कुलकर्णी यांच्यासह पतीत पावन संघटना आणि इतर हिदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते शनिवारवाडा परिसरात दाखल झाले.

आंदोलकांकडून आधी गोमुत्र शिंपडून परिसराचं शुद्धीकरण करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. यानंतर शिववंदना करण्यात आली. पण आंदोलन इथेच थांबलं नाही. आंदोलकांनी परिसरात असणाऱ्या मजारला विरोध केला. तसेच या परिसरात भगवा झेंडा लावू द्या, अशी मागणी आंदोलकांनी केली. पण पोलिसांनी आंदोलकांना मज्जाव केला. यामुळे आंदोलक आक्रमक झाले.

आंदोलक आक्रमक झाल्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. आंदोलकांकडून जय श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा करण्यात आल्या. आंदोलकांनी परिसरात भगवा झेंडा फडकवू द्यावा, अशी मागणी केली. पण पोलिसांनी आंदोलकांना मज्जाव केला. यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला. भगवा झेंडा फडकवल्याशिवाय जाणार नाही, असा पवित्रा आंदोलकांनी घेतला. तर संबंधित जागा ही पुरातत्व विभागाच्या अखत्यारित आहे. त्यामुळे पुरातत्व विभागाचे अधिकारी येत आहेत, असं सांगत पोलिसांनी आंदोलकांना भगवा झेंडा फडकवण्यास विरोध केला. तर दुसरीकडे आंदोलक आक्रमक झाले. अखेर भगवा फडकवला

आंदोलकांचा पवित्रा पाहता पोलिसांकडून त्यांची समजूत काढली जात होती. पण आंदोलक परिसरात भगवा झेंडा फडकवल्याशिवाय जाणार नाही, अशा भूमिकेत होते. या ठिकाणी हिरवा झेंडा फडकवला जातो, नमाज पठण केलं जातं तेव्हा पोलिसांचं लक्ष कुठे असतं? असा सवाल आंदोलकांनी केला. आंदोलक भगवा झेंडा फडकवण्यासाठी आक्रमक झाले. भगवा झेंडा फडकवण्यास पोलिसांचा कोणताही विरोध असू नये, असं आंदोलनात सहभागी झालेल्या मेधा कुलकर्णी देखील म्हणाल्या. अखेर आंदोलकांचा आक्रमक पवित्रा पाहता त्यांना परिसरात भगवा झेंडा फडकवण्यास परवानगी मिळाली.




## दिवाळी अन् पर्यावरणाचं दिवाळं

दिवाळी आली की दिल्लीत अनेक लोकांच्या पोटात गोळा येतो. कारण दिवाळीचा दिवस, त्यातही रात्र उलटली की त्यानंतरच्या दिवसाची सुरवात कुंद हवेत होते. कोट्यवधी रुपयांचा धूर आणि ध्वनिप्रदूषणाची कमाल पातळी ओलांडणारा फटाकी दणदणाट दिल्लीसारख्या शहराच्या भौगोलिक स्थितीला न मानवणारा असला तरी दिल्लीकरांना ते मान्य नाही. मग दिवाळीच्या दुसऱ्या दिवशीच वायू गुणवत्ता निर्देशांक ४००च्या पुढच्या अतिधोकादायक पातळीवर झेपावतो. साऱ्या दिल्लीत विषारी हवेमुळे डोळ्यांची जळजळ वाढते आणि श्वास घेणंही कठीण होतं.

फटाक्यांत असलेली रसायनं, धातूचे क्षार आणि स्फोटक असं मिश्रण जळतं तेव्हा असे फटाके काही मिनिटांत नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि मोठ्या प्रमाणात पीएम २.५ व पीएम १०सारखे अती सूक्ष्म कण असलेला विषारी वायू हवेत सोडतात. हे कण इतके लहान असतात की ते फुफ्फुसांत आणि रक्तप्रवाहात थेट घुसखोरी करतात, ज्यामुळे लहान मुलं, रुग्ण, ज्येष्ठ नागरिकांचे प्राण कंठाशी येतात. प्रदूषण हाताबाहेर गेलं या एकमेव कारणास्तव शाळांना सुट्ट्याही द्याव्या लागाव्यात, अशी दिल्ली ही जगातली एकमेव राजधानी असावी.

गेल्या काही वर्षांत दिल्लीत दिवाळी आली की फटाक्यांविरुद्ध 'से नो टू क्रॅकर्स' अशी मोहीम सुरू होते. 'मेणबत्ती संप्रदाया'चा त्यातही पुढाकार! पण दिवाळीत अशा मोहिमेचीही निरर्थकता एखाद्या फुसक्या फटाक्यासारखी पुन्हा पुन्हा सिद्ध होते. यंदा तर नेहमीपेक्षा अलीकडं आलेल्या दिवाळीपूर्वी थंडीचंही आगमन झाल्यानं दोन दिवस आधीपासून 'एक्यूआय'नं इशारे देण्यास सुरुवात केली आहे.

एका अंदाजानुसार बंदी असल्याच्या काळातही केवळ दिल्लीत दर दिवाळीत किमान २० कोटी रुपयांच्या फटाक्यांची विक्री होत असल्याचं सांगितलं जातं. २०२३ मध्ये दिल्ली सरकारनं फटाक्यांची विक्री, साठवणूक आणि वापरावर (पुन्हा एकदा) पूर्ण बंदी घातली. त्याच वर्षी, फक्त एका महिन्यांत १२ हजार किलो फटाके जप्त करण्यात आले होते. यंदाही अशी जप्ती सुरू आहे. पण जप्त केलेले फटाके ठेवलेल्या ठिकाणीच दिवाळीत जो दणदणाट होतो, त्याचं कूळ आणि मूळ कसं शोधायचं? बंदीला दिल्लीकर जुमानत नाहीत व जुमानणार नाहीत याचा पूर्वानुभव असल्यानं सर्वोच्च न्यायालयाने बुधवारीच हरित फटाक्यांना दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात (एनसीआर) काही अटींसह परवानगी दिली.

पण फुटणारे फटाके खरंच हरित आहेत की नेहमीसारखेच विषारी, हे तपासणं यंत्रणेसाठी केवळ अशक्य आहे. अर्थात फटाकेबंदी आमच्याच सणाला का, असा ओरडा करणाऱ्यांचा न्यायालयानं जाता जाता हिरमोड केला असणार. निर्बंधांचं वारंवार उल्लंघन केलं जातं, ज्यामुळं फटाकेबंदीबाबत संतुलन राखणं आवश्यक होतं, असं सरन्यायाधीश भूषण गवई यांनी स्पष्ट केलं. पण यासाठीच्या अटी-शर्तींना विरोध करताना फटाक्यांवरील वेळमर्यादा काढून टाकण्याची मागणी केली गेली ती स्वाभाविकच! अशा हरित फटाक्यांमुळे उत्सर्जन ३० ते ३५ टक्क्यांनी कमी होणं शक्य असल्याचं सांगितलं गेलं, तरी बाजारातील मागणी व पुरवठा यांचं प्रमाण इथंही व्यस्तच असतं.

हरित फटाक्यांना १०० टक्के निरुपयोगी म्हणणं थोडंसं अतिशयोक्तिपूर्ण ठरेल, कारण तेही प्रदूषण करतातच. असे फटाके धूर, सल्फर डायऑक्साइड आणि नायट्रोजन ऑक्साईड तुलनेत कमी उत्सर्जित करतात. सामान्य फटाक्यांची आवाज पातळी १६० डेसिबलपर्यंत, तर हरित फटाक्यांची आवाज पातळी ११० ते १२५ डेसिबल असते, असेही युक्तिवाद केले जातात. पण त्यांची सत्यासत्यता पडताळण्यासाठी अख्ख्या दिल्लीत कोणतीही प्रयोगशाळा किंवा चाचणी सुविधाच नाही. बाहेर फटाक्यांचा आणि घरात बाप्या माणसांच्या जल्लोषाचा 'स्फोट', ही परंपरा पाळल्याशिवाय अनेक दिल्लीकरांची दिवाळीची रात्र साजरीच होत नाही! मुळात 'हरित फटाके' नावाचा प्रकार जादूच्या कांडीसारखा वायूप्रदूषण गायब करतो, हा समजच चुकीचा असल्याचं वैज्ञानिकांपासून अनेक जाणकारांनी वारंवार स्पष्ट केलंय. ऋहरित फटाके म्हणजे सात्त्विक दारूसारखेऋ असंही विनोदानं म्हणतात!

दिल्लीत दर हिवाळ्यात हवा विषारी बनते त्याला इतरही कारणं असतातच. हिवाळ्यात दिल्लीतील हवा विषारी बनण्यामागे फटाके, पराली, वाहनधूर, औद्योगिक उत्सर्जन, धूळ आणि हवामानाचे घटक कारणीभूत असतात.

# गावाकडील आठवणीतील दिवाळी

भारतीय संस्कृतीतील प्रमुख सणांपैकी दिवाळी हा प्रमुख सण आहे. साधारण हा सण पाच ते सहा दिवसांचा असतो. दिवाळसणाची चाहूल ही वसुबारसपासून लागते.हा सण अश्विन महिन्यातील वद्य द्वादशीला साजरा केला जातो. याला गोवत्स द्वादशीसुद्धा म्हणतात.या दिवशी वसुबारस अर्थात गाय व तिच्या वासराची पूजा केल्या जाते.दिवाळसणातील दुसरा दिवस म्हणजे धनत्रयोदशी.हा सण नेपाळ व भारतात साजरा केला जातो. हिंदू परंपरेनुसार धन्वंतरी देवता आरोग्याची देवता म्हणून ओळखल्या जाते. सर्वांचे आरोग्य निरोगी राहो यासाठी या देवतेचे पूजन केल्या जाते.निरोगी शरीर व मनाच्या प्रसंन्नतेसाठी प्रार्थना केली जाते.त्यानंतर तिसरा दिवस हा नरक चतुर्दशी म्हणून ओळखला जातो. या दिवशी अभ्यंगस्नान केले जाते.हा सण वाईटांवर चांगल्यांचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो.चौथा दिवस हा लक्ष्मी-कुबेराच्या पूजनाचा असतो. या दिवशी लक्ष्मी कुबेर या देवतेचे पूजन केले जाते.धन हे लक्ष्मीचे प्रतीक मानल्या जाते.अर्थात पैसा केवळ हे गरज भागवण्याचे साधन असले, तरी घरात सुख-समृद्धी नांदो.यासाठी लक्ष्मी-कुबेराचे पूजन केले जाते. दिवाळी सणातील पाचवा दिवस हा दीपावली पाडवा व बलिप्रतिपदा म्हणून साजरा केला जातो.यातील दीपावली पाडवा पती-पत्नीच्या प्रेमाचे प्रतीक आहे, तर बलिप्रतिपदा हा शेतकरी राजांच्या उदार व समर्पण भावाचे प्रतीक आहे. दिवाळी सणातील अंतिम दिवशी भाऊबीज हा सण साजरा केल्या जातो. या दिवशी बहिण भावाला औक्षण करते. त्याच्या सुखा- समाधानासाठी व दीर्घ आयुष्यासाठी प्रार्थना करते. या सर्व पाच ते सहा दिवसांच्या सणांच्या आनंदमय वातावरणामुळे चहूकडे प्रसन्नता असते.

या दिवाळी सणाला संपूर्ण महाराष्ट्राबरोबर भारतातील शाळा- महाविद्यालयांना सुट्ट्या असतात.जिल्ह्यानुरूप साधारण दहा ते पंधरा दिवसांच्या या सुट्ट्यांमध्ये मुले खूप धमाल करतात. मात्र गावाकडे आमच्या काळात काही अंशी वेगळी परिस्थिती होती.प्रथम सत्र परीक्षा झाली की,आम्ही मुलं शेतात कामाला जायचो. हा काळ म्हणजे शेतकऱ्यांच्या सुगीचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात सोयाबीन, मका काढणीवर येतात तर झाडावर पिकलेल्या लाल मिरच्या तोडण्याची वेळ असतें. त्याचबरोबर कापूस वेचणीचीही वेळ असते.खरीप पिक घेऊन शेतकरी राजा हा रब्बी पिक पेरणीच्या तयारीला लागलेला असतो. तर या काळात शेतकरी हे शेतीच्या कामात गुंतलेले असायचे. खरिपातील हंगाम घेऊन रब्बीच्या तयारीला लागलेले असायचे. दिवाळीच्या सुट्ट्या लागलेल्या असायच्या. आमच्याकडे स्वतःची शेती नव्हती.आम्ही भावंडे गल्लीतील मित्रमंडळीसोबत दुसऱ्याच्या शेतात किलो प्रमाणे मिरच्या तोडायला व कापूस वेचला जायचो.

गावाकडील शाळेला दिवाळीला मस्तपैकी पंधरा दिवस सुट्ट्या असायच्या व आमच्या मनाच्या त्यात पाच दिवसअश्या एकूण साधारण वीस दिवसाच्या सुट्ट्या पकडून शाळेला दांडी असायची. सुट्ट्या लागल्याबरोबर दुसऱ्या दिवशी कुणी शेतकऱ्यांने बोलवल्यास शेतात मिरच्या तोडायला व कापूस वेचायला कामावर येण्यास हो म्हणायचो. कारण या कामातून मिळालेल्या पैशातून आम्ही पोरं फटाके, शाळेच्या वस्तू वगैरे घ्यायचो. मला तर लहानपणापासून शालेय वस्तूंचीच आवड होती.त्यामध्ये विशेषतः छान पेन, चित्रकलेची वही, रंग कामाचे साहित्य, एखादे-दोन छान-छान



गोष्टीचे पुस्तके यासाठी हा सर्व खर्च करायचो. कारण मला लहानपणापासून चित्रकला, पुस्तक वाचनाबरोबर शाळेसंबंधी वस्तू खरेदी करण्याची खूप हौस होती. अजूनही आहेच. त्यामध्ये विशेषतः डायरी, पेन पुस्तक रंगकामासाठी साहित्य या गोष्टी मला अजूनही खरेदी करायला आवडतात.

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये सकाळी लवकर उठायचो. ऑक्टोबर-नोव्हेंबरचा काळ असल्यामुळे काही अंशी थंडीची चाहूल लागलेली असायची. त्यातही आई-बाबा आम्हाला सकाळी पाच ते सहा वाजताच झोपेतून उठवायचे.आंघोळ केली की झोप उडवायची.मात्र थंडी जाणवल्यास बाहेर शेकोटी पेटवायचो. शेकोटीतून उब घ्यायचो. तोपर्यंत आई स्वयंपाक बनवायची.आई वावरात नेण्यासाठी पालवामध्ये भाकरी बांधून द्यायची. एक टोपलं घेऊन मिरच्या तोडण्यासाठी वावरात निघायचो.कापूस वेचायला गेलो तर मात्र,आईच्या जुन्या लुगड्याचा कापड घेऊन जायचो,कारण कापूस वेचण्यासाठी त्याची ओटी बनवावी लागायची.सकाळी-सकाळी सुंदर सूर्यप्रकाशात आम्ही पोरं पंढरीला निघणाऱ्या वारी प्रमाणे पांद-रस्त्याने वावरात जायचो. जातांना मौज-मस्ती करत जायचो. रस्त्याने एखादी विहीर लागली की, लगेच एक डुबकी मारायचो.तशाच ओल्या अंगाने कुडकुडत निघायचो. हवेने आणि सूर्यप्रकाशाने अंगावरील कपडे कधी सुकून जायचे हे कळतही नव्हते. खरंच! किती हा रांगडेपणा...! आता आठवण आली तर डोळ्यातून अश्रूंच्या धारा थांबत नाही. या आठवणींच्या साठवणीचं भलं मोठं गाठोड उकलायला लागलो की,गावाकडील जगलेले सुवर्णक्षण एकामागून बाहेर पडतात व मन आठवणीत रमून जातं. वावरात पोहोचले की, आंब्याच्या किंवा निंबाच्या झाडाला चटणी,भाजी भाकरी टांगून द्यायचो. कारण खाली ठेवली तर कुत्रे येऊन खाऊन टाकायचे.काम करून थकल्यामुळे अश्यावेळेस कडाडून भूक लागल्यावर पंचायत व्हायची.म्हणून तशी काळजी घ्यावी लागे. वावरातील एक तास म्हणजे एक सरळरेषेत लावलेली मिरचीच्याकिंवा कपाशीच्या झाडांची रांग. तर अश्या दोन रांगा एका-एकाने घेऊन मिरची तोडायला किंवा कापूस वेचायला सुरुवात करायचो. त्या दोनतासालावखरम्हणायचे. दिवसभरातून साधारण आम्हां चौदा ते पंधरा वयोगटातील मुलांकडून साधारण तीस ते पस्तीस किलोपर्यंत मिर्च्या तोडून व्हायच्या.संध्याकाळी शेतमालक तोडलेल्या मिरच्यांची पोतडी वजन काट्याला टांगून वजन करायचे. कागदावर नाव लिहून नोंद ठेवायचे. साधारण एक रुपया किलो प्रमाणे प्रमाणे तोडायची मजुरीअसायची. म्हणजेच तीस ते पस्तीस रुपये रोज त्या काळात आम्ही शेतात काम करून कमवायचो.

दिवाळीच्या या पंधरा ते वीस दिवसाच्या सुट्ट्यांमध्ये जवळपास दहा ते बारा दिवस कामाला गेल्यावर साधारण साडेचारशे ते पाचशे रुपये कमवायचो.चारसे ते पाचशे रुपये म्हणजे आमच्यासाठी खूप होते. एका आठवड्याचे किंवा साधारण दोन आठवड्याचे हे बाजाराच्या दिवशी जमा झालेले पैसे आम्ही मुलं एका डब्यात ठेवायचो.दिवाळी जवळ आली की, आवडीच्या वस्तू खरेदी करायचो. खेड्यातील हे जीवन म्हणजे गोरगरीब लोकांच्या जीवन जगण्याच्या कसोटीतील क्षणांचा चित्रपट असतो.अनेक अडचणी असूनही आनंदाने कसे जगावे? खेड्यातील माणूस यातील एक कलाकार म्हणून महत्त्वाची भूमिका निभावत असतो. जरी त्याची नोंद नसली तरी,मात्र ज्याने हे क्षण अनुभवले तो त्या कथेतील नक्कीच हिरो असतो. विशेषतः गावाकडील माझा शेतकरी राजा. हा दिवाळसणासारख्या या प्रमुख सणांमध्ये सुद्धा शेतात राब-राब राबत असतो. केवळ सर्वांच्या मुखी घास यावा. यासाठी तो सदैव झटत असतो. येणाऱ्या अस्मानी,सुलतानी संकटांचा सामना करत.तो खंबीर उभा असतो.एखाद्या पर्वतासारखा.ऊन, वारा पाऊस सर्व काही सुख-दुःख सहन करत जगत असतो.

दिवाळसणातील वसुबारसच्या पहिल्या दिवसापासून लागलेली चाहूल ते भाऊबीज या दरम्यान शाळेला लागलेल्या पंधरा ते वीस दिवसाच्या सुट्ट्यात वावरात जाऊन जमवलेल्या पैशातून आवडीच्या वस्तू खरेदी करायचो. काहीजण घरातील गरजेच्या वस्तूसाठी हातभार लावायचे.बाबा आमच्यासाठी कपडेलत्ते घ्यायचे.आई गोडधोड असे फराळाचं बनवायची. त्यामध्ये चकली, चिवडा,शेव बेसनाचे लाडू, रव्याचे लाडू शंकरपाळे,करंजी वगैरे असे पदार्थ असायचे.मित्रमंडळी एकमेकांना फराळाला बोलवायचे.यातून गाठीभेटी व्हायच्या. परिस्तिथी लक्षात घेऊन काही वडिलधारे मंडळीनी नवीन कपडे खरेदी केले नाही तरी त्यांना स्वच्छ धुऊन प्रेस मारून घालायचे.मात्र कधी त्याचे दुःख मानले नाही. मर्यादित गरजा होत्या.मात्र त्यातही जगण्यात खूप आनंद होता. गावाकडील लोकांचं जगणं व जश्या आहे तश्या परिस्थितीत आनंद मानून सण साजरे करण्यात खूप मोठे गूढ आणि समर्पण सुद्धा होते.

गावाकडील लोक सुखी,समाधानी व आनंदी आहेत.त्यांना डिजिटल लाईफ अजून माहीत नाही.अन जे झगमगाटात जगतात.डिजिटल होऊ पाहतात त्यांना एकमेकांना स्टोरी, स्टेट्स ठेऊन दाखवाव लागतंय कि,आम्ही आनंदी आहोत. विशेष म्हणजे काहिजण तर, या पण भ्रमात असतात स्टोरी, स्टेट्स न टाकणारे सुखात नसावेत.पण सत्य असं असतं की, ते लोक दाखवण्यापेक्षा प्रत्यक्षात त्या वास्तविक क्षणात त्यांचं सुख साजरं करत असतात.त्यांना या दिखावेपणाच्या मायावी जगाची अनुभूती आधीच आलेली असते.अशी ही गावाकडील साजरी होणारी ही दिवाळी खरंच!सुवर्णक्षणाचा साठा आहे. गावाकडील लोकांचा सण समारंभ साजरा करण्यात साधेपणा असला तरी मात्र रूढी,परंपरेला व संस्कृतीला धरून सण साजरे होतात.त्याचप्रमाणे निखळ प्रेम,आनंद,प्रसन्नता दिसून येते.अश्या या गावाकडील दिवाळीच्या आठवणी कायम स्मरणात राहतील.

**श्री. विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## नरकचतुर्दशी

नरक चतुर्दशी दिन
अभ्यंगस्नान महत्व
बाह्ममुहूर्त साधावा
गुण दे अविनाशत्व

हवेत जाणवे बदल
उत्साहवर्ध जीवीत्व
तैल मर्दन सर्वांगांस
जावो पूर्ण मलिनत्व

दुर्गुणांचे परिमार्जन
गळे अहम्अदंभित्व
मांगल्याची सुप्रभात
जाई द्वेषअलोलुपत्व

त्वचेला येई स्निग्धता
हो स्नेह वर्धन ममत्व
उनपाण्याने स्नानकरे
लाभदायक नियंतृत्व

रज तम गुण जातीलं
स्नानानेवाढे गुणसत्व
कारीट फळ ठेचायचे
नरकासुरवध कवित्व

अप मृत्यू निवारणार्थ
यमतर्पणे येई तेजोत्व
दीपदान आज करावे
नियंतृत्व वृध्दीदातृत्व

स्नानाचे इतके महत्व
मनुष्य अंतरात देवत्व
सणामागे दडलेशास्त्र
जाणावेकाय अस्तित्व

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा राजा असो की झोपडीत राहणारा गोरगरीब प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर



कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील १३ कोटी जनता देवाजवळ करत आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत. गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू. मानवतेचा दिप लावू!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नवी मुंबईत बालनाट्य शिबिराचे आयोजन



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१९, नवी मुंबई :** नवी मुंबई बालरंगभूमी आणि संत शिरोमणी कला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने नाटककार. श्रीहरी पवळे यांनी बालनाट्य शिबिराचे आयोजन विष्णुदास भावे नाट्यगृह येथे दिनांक २४ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०२५ या दिवाळी सुट्टीतील कालावधीमध्ये आयोजन आहे. यापूर्वीचे सभासद असलेल्या बालकलाकारांना विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. गेली २९ वर्षापासून नवी मुंबईतील पहिले बालनाट्य शिबिर आहे. दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीतील शालेय सुट्टीतील कालावधीमध्ये या शिबिराचे नियोजन असते. बालनाट्य कार्यशाळेत मुलांना रंगभूमी आणि अभिनय कौशल्य विकसित करण्यासाठी आयोजित केले जाते. जसे की संवाद, शरीराची भाषा भावनिक अभिव्यक्ती, नेपथ्य, प्रकाश योजना महत्त्व समजावले जाते व त्याचा वापर कसा करावा हे शिकविले जाते. चेहऱ्यावरील विविध प्रकारचे रंग लावून पात्र निर्मिती केली जाते. या कार्यशाळेत मुलांना आत्मविश्वास वाढवण्यात सर्जनशीलता वाढवण्यात आणि सांघिक काम करण्याची कौशल्य विकसित करण्यास मदत होते. या बालनाट्य अभिनय कार्यशाळेत नाट्य कलेचे विविध पैलू शिकविण्यात येतात त्यांना रंगपंचावर स्वतः ला व्यक्त करण्याची संधी मिळते मुलांच्या कल्पनांवर आधारित नाट्यनिर्मिती सादरीकरणही होते. बालनाट्य अभिनय मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एक उत्कृष्ट मार्ग आहे. हे त्यांना व्यक्त करण्याची संधी मिळते. मुलांच्या कल्पनांवर आधारित नाट्यनिर्मिती सादरीकरणही होते बालनाट्य अभिनय मुलांच्या हे त्यांना सर्जनशील आत्मविश्वासी आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम बनविण्यास मदत होते. हे बालनाट्य अभिनय शिबिर शुक्रवार, दिनांक २४, ऑक्टोबर पासून रोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे होत आहे. नवी मुंबईतील बालकलाकारांनी लाभ घेऊन आपल्या कला सुप्त गुणांना वाव द्यावा असे आवाहन नाटककार श्रीहरी पवळे यांच्याकडून करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी मो.नं. ९३२२५०४३१४ या मोबाईल नंबर वरती संपर्क साधावा असे श्रीहरी पवळे यांनी सांगितले.

## माणूसकी फाऊंडेशन (रजि) आयोजित निराधार वृध्द बांधवांसाठी दिपावलीनिमित्त दिवाळी फराळ वाटप



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, मिरा भाईंदर :** रविवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी माणूसकी फाऊंडेशन (रजि) आयोजित निराधार वृध्द बांधवांसाठी दिपावलीनिमित्त दिवाळी फराळ वाटप समर्थ आश्रम याठिकाणी पार पाडला. या कार्यक्रमात माणूसकी फाऊंडेशनचे अध्यक्ष घनश्याम आंबोकर, उपाध्यक्ष विजय काकडे, सचिव राजेश जाधव, खजिनदार विजय गोडबोले यांनी अनाथ वृध्द आणि व्याधिग्रस्त भगिनी व बांधवांना फराळ वाटून दिवाळी साजरी करण्यात आली या निराधार बांधवांच्या चेहर्यावरील स्मित हास्य हिच खरी संस्थेच्या कामाची पावती आहे. या कार्यक्रमासाठी माणूसकी फाऊंडेशन च्या सर्व पदाधिकारी सभासद हितचिंतक यांनी जे सहकार्य केलं त्या सर्वांच आभार तसेच रतिलाल चौहान यांनी या कार्यक्रमास विशेष सहकार्य केल त्यांच देखील संस्थेच्या वतीने आभार तसेच जीवन आनंद संस्थेचे विश्वस्त किसन चौरे, व्यवस्थापक हेमंत माळी व त्यांच्या सहकार्यांच विशेष कौतुक आणि आभार मानले.

## म्हाते खुर्द ग्रामस्थांचा स्तुत्य उपक्रम; म्हाते खुर्द-श्रमदानातून साकारतंय समृद्धीचं स्वप्न



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१९, सातारा :** दिवाळीचा आनंदोत्सव सुरू असताना ही म्हाते खुर्द ता.जावली येथील ग्रामस्थांनी स्वच्छतेचा आणि श्रमदानाचा संकल्प कायम ठेवत समाजाला प्रेरणा दिली आहे. आज गावातील नागरिकांनी एकत्र येऊन उत्साहाने श्रमदान कार्यक्रम राबविला. सणाच्या काळातसुद्धा ग्रामविकासासाठी दिलेला हा वेळ गावकऱ्यांच्या एकजुटीचे आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरला. या उपक्रमात महिला, युवक, तसेच ज्येष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, व मंदिर परिसरात स्वच्छता करून स्वच्छ गाव – सुंदर गाव या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. ग्रामस्थांनी यावेळी सांगितले की, मुख्यमंत्री पंचायत राज समृद्धी अभियानात म्हाते खुर्द हे नाव अग्रक्रमाने उजळेल, असा दृढ विश्वास आणि आशावाद त्यांनी व्यक्त केला. स्वच्छतेचा दीप आणि श्रमदानाची परंपरा जपणारे म्हाते खुर्द हे गाव आजही समाजासाठी आदर्श ठरत आहे. अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## माळकुपच्या कृषीनाथ ग्रीन एनर्जी कारखान्याच्या तिसऱ्या गळीत हंगामाचा भव्य शुभारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** साखर कारखानदार साखर उत्पादनाबरोबरच इथेलॉन वीज व सीएनजी उत्पादन निर्मितीकडे वळाले असून यापुढील काळात साखर कारखानदारी महाराष्ट्र व सहकाराचा आर्थिक कणा ठरणार असल्याचे पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले तर माळकुपच्या माळरानावर कृषीनाथ ग्रीन एनर्जी कारखान्माने साडे तीन लाख मेट्रिक उद्दीष्ट ठेवले असुन या पाठीमागे या संचालक मंडळाचे सहकार चळवळ संस्कार असल्याचे गौरवोद्गार पद्मश्री पवार यांनी काढले आहे. माळकुप येथील कृषीनाथ ग्रीन एनर्जी कारखाना बॉयलर अग्नीप्रदीपन कार्यक्रम नुकताच पद्मश्री पोपटराव पवार व श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखानाचे चेअरमन डॉ.पांडुरंग अण्णा राऊत प्रदिप नाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

## उमरी पोतदारचे आरोग्य मंदिर म्हणजे आधुनिक सुविधांचा संगम - आ.मुनगंटीवार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** पोंभूर्णा तालुक्यातील उमरी पोतदार येथे प्राथमिक आरोग्य केंद्र संकुलासाठी ८ केटी ७५ लाख २५ हजार रुपये आणि स्मार्ट आरोग्य केंद्रासाठी १ कोटी ३२ लाख ७७ हजार ४९० इतका रुपयांचा निधी मंजू करुन आरोग्य मंदिर उभारलेले आहे. हे आरोग्य मंदिर म्हणजे लोकसहभाग, सेवाभाव आणि आधुनिक सुविधांचा संगम आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी लोकार्पण सोहळ्यात केले.

उमरी पोतदार येथील प्राथमिक आरोग्य मंदिराच्या नवीन इमारतीचे लोकार्पण आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, उपविभागीय अधिकारी लघिमा तिवारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, डॉ. मंगेश गुलवाडे, रामपाल सिंग, संध्या गुरनुले, अलका आत्राम, हरीश ढवस, सरपंच ठामेश्वरी लेनगुरे, नगराध्यक्षा सुलभा पिपरे, राहुल संतोषवार, ज्योती बुरांडे तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संदेश मामीडवार आदींची उपस्थिती होती.

आमदार मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यातील मेडिकल कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल, कळमना, मानोरा व पोंभूर्णा आता उमरी पोतदार आरोग्यसेवेच्या प्रवासातील नवा आणि प्रेरणादायी टप्पा ठरला आहे. जिल्ह्याचा पालकमंत्री असताना महाराष्ट्रातील सर्वाधिक निधी चंद्रपूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना दिला. आरोग्य क्षेत्रात आपला जिल्हा नेहमीच पुढे राहावा, असा माझा प्रयत्न आहे. ग्रामस्थांच्या एकोप्याने आणि लक्ष्मण सायलू सल्लम व सोयाजी नामेवार यांच्या भूमिदानाने उमरी पोतदार आरोग्य मंदिराला खऱ्या अर्थाने सामाजिक पाया मिळाला आहे. नागरिकांनी आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करुन या आरोग्य मंदिराच्या माध्यमातून उत्तम आरोग्य राखावे, असे आवाहन आ. मुनगंटीवार यांनी केले. या आरोग्य केंद्रात अत्याधुनिक यंत्रसामुग्री, सर्व आवश्यक सोयी-सुविधा तसेच भविष्यात आजार उद्भवू नये यासाठी पूर्वतयारी करण्यात आली आहे. गर्भवती महिलांसाठी उत्कृष्ट सोयीसुविधांची व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे. प्रधानमंत्री टी. बी. मुक्त भारत अभियानांतर्गत विनोद देशमुख यांनी निक्षय मित्र म्हणून तालुक्यातील ४३ क्षयरुग्णांना दत्तक घेतले. आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते या रुग्णांना पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले.

### चंद्रपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे हेलिपॅडची सुविधा

महाराष्ट्रातील कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हेलिकॉप्टर अँब्युलन्ससाठी हेलिपॅडची व्यवस्था नाही. मात्र, चंद्रपूरचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे राज्यातील एकमेव महाविद्यालय आहे. जिथे हेलिपॅडची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच १४० खाटांचे कॅन्सर हॉस्पिटलचे उद्घाटन लवकरच करण्यात येणार आहे. या कॅन्सर हॉस्पिटलमध्ये हेलियम न वापरणारी देशातील पहिली एमआरआय मशीन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जिल्ह्यात कॅन्सर तपासणी शिबिरे देखील आयोजित करण्यात येत आहे.

## घरफोडी प्रकरणात एका विधीसंघर्ष इसमाला अटक

### मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** १७ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरचे पथक शहर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, मुखबिराकडून माहिती मिळाली की एक इसम बिनबा गेट, शांतीधाम परिसरात संशयास्पदरीत्या फिरत आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार पथकाने तत्काळ त्या ठिकाणी धाव घेऊन संशयित इसमास ताब्यात घेतले. स्थानिक गुन्हे शाखेने एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेऊन एका घरफोडी प्रकरणाचा उलगडा केले आहे. त्यात बालका कडून १ लाखांचा दोन सोन्याचे अंगठी जप्त केले. त्याबाबत चौकशी केली असता, बालकाने घुटकाला वार्ड, चंद्रपूर येथे घरफोडी केल्याची कबुली दिली.

पुढील चौकशीत सदर बालकाकडून चंद्रपूर शहर पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या गु. र. नं. ७५४ / २५ कलम ३०५ (अ), ३३१(३), ३३१(४) भा.दं.सं. अंतर्गत दाखल घरफोडी प्रकरणातील मुद्देमाल जप्त करण्यात आला. हा मुद्देमाल बालकाच्या वडिलांच्या व पंचांच्या उपस्थितीत ताब्यात घेण्यात आला.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सर्वेश बेलसरे, पोहवा नितीन साळवे, पोअं नितीन कुरेकार, अमोल सावे, चापोहवा गजानन मडावी यांनी केले. स्थानिक गुन्हे शाखेच्या सतर्कतेमुळे घरफोडी प्रकरणाचा उलगडा झाला असून, जप्त मुद्देमाल व बालक पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणे चंद्रपूर शहर यांच्या ताब्यात देण्यात आले.

## सोने सव्वा लाखाच्या पुढे जाऊन ही ठाण्यात ग्राहकांची सोन्याच्या मिठाईला पसंती



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१९, ठाणे :** वाढत्या सोन्याच्या दराचा परिणाम यंदा विशेष समजल्या जाणाऱ्या सुवर्ण मिठाईवर झालेला पहायला मिळतोय. दिवाळीनिमित्त दरवर्षीप्रमाणे ठाण्यातील प्रशांत कॉर्नर मिठाई दुकानात यंदा देखील सोन्याचा वरखं असलेली मिठाई ग्राहकांसाठी उपलब्ध आहे. मात्र यंदा या मिठाईची किंमत ५० हजार रुपये किलो इतकी आहे. हा दर सर्वांनाच परवडणारा नसल्यानं नगावर ही मिठाई यंदा विकली जातं आहे.

यंदा सोन्याचा दर १ लाख ३४ हजारांवर पोहचलाय. तरीही ठाण्यातील सुप्रसिद्ध प्रशांत कॉर्नर यांनी यंदा देखील २४ कॅरेट सोन्याचा वरख असलेली मिठाई बाजारात आणली आहे. ममरा बादाम, काश्मिरी केसर, पिस्ता यासारख्या अतिउत्तम जिन्नस वापरून तयार केलेली ही मिठाई ८,१२, १८ आणि २४ नगामध्ये उपलब्ध केली आहे. ५० हजार रुपये किलो इतकी किंमत या मिठाईची ठेवली आहे. मिठाईची किंमत जास्त असली तरीही ग्राहक त्याला पसंती देत आहेत. प्रशांत कॉर्नरमध्ये ५० हजार रुपये किंमतीची सुवर्ण मिठाईदीपावलीसाठी खास मिठाई उपलब्ध आहे. दीपावली या सणाचा आनंद आणि गोडवा द्विगुणित करण्यासाठी ठाण्यातील सुप्रसिद्ध प्रशांत कॉर्नरनं खास दिवाळी आणि लक्ष्मीपूजनासाठी स्पेशल मिठाईची उपलब्ध केली आहे.

दुकानात प्रवेश करताच तब्बल ५० हजार रुपये किलो अशी सुवर्ण मिठाई सर्वांचं लक्ष वेधून घेतं. प्रशांत कॉर्नरमध्ये विविध मिठाई उपलब्ध : आकर्षक पेटीमध्ये पॅक केलेली ही मिठाई ठाणेकरांच्या पसंतीस येत असून अनेक ग्राहक ही मिठाई घेत आहेत. लाडू, पेढे, बर्फी, गुलाबजाम, हलवा यासारख्या नेहमीच्या पदार्थांसोबतच नारळीपाक आणि नारळाची बर्फी हे दोन विशेष प्रकार यावर्षी विक्रीस ठेवले आहेत. भारताच्या प्रत्येक प्रांतातील व्यक्तींना आपल्या आवडीची मिठाई मिळावी. यासाठी राजस्थान, मध्यप्रदेश या भागात विशेष पसंत केली जाणारी घेवर देखील ठाणेकरांसाठी उपलब्ध केली आहे. शुद्ध तुपातील घेवर आणि इतर मिठाई बनवण्यासाठी प्रशांत कॉर्नर यांचं स्वतंत्र स्वयंपाकगृह असून सर्व मिठाई इथंच बनवल्या जातात. तसंच ठाणेकरांसाठी माफक दरात उपलब्ध करून दिल्या जातात. यावर्षीचं आकर्षण म्हणजे स्पेशल ड्रायफ्रूट, नमकीन आणि इतर अनेक वस्तूंनी सजलेला गिफ्ट हॅंपरदेखील प्रशांत कॉर्नरतर्फे उपलब्ध केलं आहे, असं दुकानाचे व्यवस्थापक हरीश बोबडे यांनी सांगितलं.

भारतातील अत्यंत महागड्या समजल्या जाणाऱ्या पॅकिंग कंपन्यांचं आकर्षक पॅकिंग हे या मिठाईचं वैशिष्ट्य आहे. सोबतच आंतरराष्ट्रीय दर्जा असलेला सुका मेवा वापरून गिफ्ट पॅक केले जातात. सोन्याची मिठाई यांचं पॅकिंग हेच ग्राहकांच्या पसंतीला उतरत आहेत. मिठाई खाऊन झाल्यावर पुन्हा या पॅकिंगचा वापर करता येतो. त्यामुळं हे आकर्षक पॅकिंग या मिठाईच्या विक्रीचा मुख्य आकर्षण आहे.दरम्यान आयकर विभाग ही मिठाई खरेदी करणाऱ्या ग्राहकांवर बारीक लक्ष ठेवून असतो. त्यामुळं एवढी महाग मिठाई विकत घेणाऱ्या ग्राहकांना विशेष खबरदारी देखील घ्यावी लागते. या ठिकाणी होणारे व्यवहार हे रोख, ऑनलाइन पेमेंट आणि चेक स्वरूपात होतात.

## म्हाडाच्या चितळसर-मानपाडा ठाणे योजनेतील नाराज विजेत्यांना उपमुख्यमंत्री शिंदेनी केले आश्वत



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१९, ठाणे :** म्हाडाच्या कोकण मंडळाच्या योजना क्रमांक ४३६ – मानपाडा चितळसर, ठाणे या गृहयोजनेचा सोडत निकाल नुकताच जाहीर झाला. मात्र, निकाल लागल्यानंतर विजेते ठरलेले नागरिक जेव्हा प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन प्रकल्पाचा आढावा घेऊ लागले, तेव्हा त्यांना घरांच्या प्रचंड किमती पाहून आश्चर्याचा धक्का बसला आहे. विजेत्यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकल्पातील म्हाडाच्या घरांचे दर हे खाजगी विकासकांच्या प्रकल्पांपेक्षा ही जास्त असून, त्या तुलनेत सुविधांचा अभाव स्पष्ट जाणवतो. सामान्य लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचा म्हाडाचा उद्देश असतानाही, या ठिकाणचा प्रकल्प त्यास अपवाद ठरल्याचे विजेत्यांचे मत आहे. या संदर्भात या ठिकाणच्या विजेत्यांनी सामूहिक निवेदनाद्वारे न्याय मिळवून देण्याची विनंती ना. एकनाथ शिंदे यांना त्यांच्या ठाणे येथील निवास्थानी केली, यावेळी ना. एकनाथ शिंदे यांनी विजेत्यांना आश्वत केले.

सदर प्रकल्पातील उच्च दरांमुळे विजेत्यांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण पसरले आहे. अनेक लाभार्थ्यांनी म्हाडा प्रशासनास घरांच्या विक्रीत किमतीत फेरविचार करून त्या परवडणाऱ्या दरात निश्चित करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून सर्वसामान्यांना या योजनेचा खरा लाभ घेता येईल. विजेत्यांचा असा सूर आहे की, दर इतके प्रचंड असल्याने आम्हाला स्वप्नातील घरावर नाईलाजाने पाणी सोडावे लागेल. या प्रकरणी उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्ष घालून, या गृहयोजनेतील विजेत्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी ठाम मागणी विजेत्यांकडून सामूहिक निवेदनाद्वारे करण्यात आली.

अक्षराज



## आ.जोरगेवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज चौक फलक अनावरण, दिवाळी पहाट कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** नवीन चंद्रपूर परिसरात म्हाडा कृती समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक फलक अनावरण सोहळा व सुरेल मराठी गीतांचा दिवाळी पहाट कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी म्हाडा कृती सेवा समितीचे अध्यक्ष प्रफुल टोंगे, भाग्यवान गणफुले, राहुल तायडे, अजय हिरादेवे, पडोलीचे सरपंच विक्की लाडके, अनिल नरुले, भारतीय जनता पार्टीचे नेते नामदेव डाहुले, गुड्डू सिंग, नकुल वासमवार आदींची उपस्थिती होती. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून अभिवादन करण्यात आले. नागरिकांनी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमवून टाकला. राष्ट्रनायक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे चौकाचे नामकरण करण्यात आल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते.



यानंतर मराठी संगिताची परंपरा आणि संस्कृती यांचा संगम घडविणारा दिवाळी पहाट कार्यक्रम पार पडला. मराठी संस्कृतीचा आणि परंपरेचा गौरव करणाऱ्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फर्त प्रतिसाद मिळाला. या प्रसंगी आ. किशोर जोरगेवार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या अभिमानाचे प्रतीक आहेत. त्यांचा आदर्श विचार समाजात जोपासला पाहिजे. 'दिवाळी पहाट' सारखे सांस्कृतिक कार्यक्रम मराठी संस्कृतीला जिवंत ठेवण्याचे कार्य करतात. समाजात आनंद आणि ऐक्य निर्माण करणारे हे उपक्रम अभिनंदनास पात्र आहेत, असे ते म्हणाले. कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पाऊस आणि मंदीचे ग्रहण

## दिवाळी तोंडावर असतांना विंचूर बाजारपेठांत शुकशुकाट...

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१९, विंचूर (नाशिक) :** अवकाळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कवडीमोल दरांमुळे शेतकरी व सर्वसामान्य ग्राहक आर्थिक संकटातदिवाळी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेली असताना, विंचूर बाजारपेठांमध्ये दरवर्षी दिसणारा खरेदीचा उत्साह यंदा 'शुकशुकाट' आणि 'मंदीच्या सावटाखाली आला आहे.

अवकाळी पाऊस आणि शेतमालाला मिळालेल्या कवडीमोल दरांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले असून, त्याचा थेट परिणाम शहरातील दिवाळीच्या खरेदीवर दिसत आहे.

**अवकाळीचा मोठा फटका :**

मागील काही दिवसांत जिल्ह्यातील अनेक भागांत झालेल्या अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या खरीप पिकांचे (सोयाबीन, द्राक्ष, कांदा) मोठे नुकसान झाले आहे.

**पीक सडले, भांडवल बुडाले :**



शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या पावसाने हिरावून घेतला. अनेक ठिकाणी उभे पीक शेतातच सडून गेले, ज्यामुळे वर्षभराची मेहनत आणि लागवडीचा खर्चही वसूल झाला नाही.

**कमी दरांची दुहेरी मार :**

दुसरीकडे, बाजारपेठेत जो थोडाफार माल येत आहे. त्याला कमी दर मिळत आहेत. विशेषतः कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली असून, लागवडीचा खर्चही निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

**शेतकरी हवालदिल, व्यापाऱ्यांवर परिणाम :**

शेतकऱ्यांचे उत्पन्न पूर्णपणे घटल्यामुळे, ग्रामीण भागातील क्रयशक्ती (Purchasing Power) संपुष्टात आली आहे. परिणामी, दिवाळीसाठी आवश्यक असलेल्या कपडे, फराळाचे साहित्य, दागिने आणि सजावटीच्या वस्तूंसाठी ग्राहक बाजारपेठेकडे फिरकत नाहीत.

**व्यापाऱ्यांची चिंता वाढली :**

दिवाळीच्या काळात नेहमी ग्राहक खरेदीसाठी गर्दी करत असतात, पण यावर्षी पाऊस आणि शेतकरी संकटात असल्याने ग्राहकच नाहीत. माल पडून आहे, अशी चिंता शहरातील व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

**पावसाने खरेदीत अडथळा :**

ऐन खरेदीच्या मुहूर्तावर झालेल्या जोरदार पावसामुळे रस्त्यावरील लहान विक्रेते (रांगोळी, आकाशकंदील, पणत्या विकणारे) यांचे मोठे नुकसान झाले, तसेच खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांचा ही हिरमोड झाला.

**सामान्य नागरिकांवर महागाईचा ताण :**

उत्पन्न घटले असतानाच, महागाईने मात्र आपले डोके वर काढले आहे. खाद्यतेल, किराणा आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ झाल्याने सामान्य कुटुंबांचे बजेट कोलमडले आहे. परिणामी, 'दिवाळी साधेपणाने साजरी' करण्यावर अनेकांनी भर दिला आहे.

## उज्वल भविष्य सामाजिक संस्था यांचा मायबाप शेतकऱ्यांना गोदान अनोखा उपक्रम - उज्वला चंदनशिव

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१९, अलिबाग (रायगड) :** स्वयंपूर्णतेतुन संपन्नतेकडे गोदानाच्या माध्यमातून सामाजिक हित व सक्षमीकरणासाठी पुढाकार उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून वसुवारस सणाचे औचित्य साधून दि.१७ ऑक्टोबर २०२५ रोजी गोशाळा श्री केशव गोधन समृद्धी केंद्र, महूरे ता.तळा, जि.रायगड या ठिकाणी संस्थापक अध्यक्ष उज्ज्वला चंदनशिव, सचिव डॉ राजाराम हूलवान, खजिनदार डॉ नितीन गांधी सदर संस्था प्रतिनिधींच्या मुख्य उपस्थितीत व देणगीदार सौ रत्नप्रभा बेल्हेकर, अनिल कुमार बेल्हेकर व कुमार शारदा भाये यांच्या आर्थिक सहकार्यातून संस्थेने ग्रामीण भागातील गरजू आदिवासी शेतकरी मंगेश ठाकूर व इतर शेतकरी यांना गोदान उपक्रमांतर्गत गिर व साहिवाल जातीच्या गाई दान करण्यात आल्या. सर्वांनी गोमाताला ओवाळून गोमातेची पूजा केली तसेच राष्ट्रहित व विश्वशांतीसाठी गोमातेकडे प्रार्थना केली.

सदर उपक्रमाचा मुख्य उद्देश हा गरीब गरजू आदिवासी व शेतकऱ्यांना स्वयंपूर्णतेच्या दृष्टिकोनातून वाटचाल करावी म्हणून त्यांना प्रेरित करणे, त्यांना दुग्ध व्यवसायाच्या दृष्टिकोनातून चालना देणे, तसेच त्यांना स्वयंपूर्ण बनवणे हा होता.

सदर उपक्रम याप्रसंगी उज्ज्वला चंदनशिव यांनी उपस्थितांना गोदानाचे महत्त्व समजावून सांगितले तर डॉ.राजाराम हुलवान यांनी गायींच्या आजारासंदर्भात



सर्वतोपरी सहकार्य उपचार व मार्गदर्शन उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था संस्थेच्या केशव गोधन समृद्धी केंद्र यांच्या माध्यमातून करण्यात येईल असे आश्वासन उपस्थित शेतकऱ्यांना दिले, तर डॉ.नितीन गांधी यांनी उपस्थितांना स्वयंपूर्णतेतून सामाजिक हिताकडे कसे पोहोचता येईल या संदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच गाईचे दूध व दुग्धजन्य पदार्थ याचे आरोग्यवर्धक व व्यावसायिक महत्त्व देणगीदार रत्नप्रभा बेलेकर यांनी विशद केले. सदर कार्यक्रमप्रसंगी माजी पशुवैद्यकीय अधिकारी गडकरी, स्थानिक कार्यकर्ते व तालुका समन्वयक दीपक गडकरी, सखाराम शिंगाडे, अंकुश चंदनशिव व इतर मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते अशाप्रकारे वसुवारस सणानिमित्ताने उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था यांचा अनोखा उपक्रम संपन्न झाला.

# आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्तक्षेपामुळे सुरक्षा रक्षकांना दिलासा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** निर्माणाधीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे कार्यरत सुरक्षा रक्षकांचे मागील तीन महिन्यांचे वेतन प्रलंबित असल्याने या कामगारांवर आर्थिक संकट ओढावले होते. या पार्श्वभूमीवर सुरक्षा रक्षकांच्या प्रतिनिधी मंडळाने आमदार किशोर जोरगेवार यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. त्यानंतर आ.किशोर जोरगेवार यांच्या सुचनेनुसार शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता मिलिंद कांबळे यांनी बैठक घेऊन सुरक्षा रक्षकांच्या मागण्या मान्य केल्या आहेत.

या बैठकीला भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, भाजप नेते प्रकाश देवतळे, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, महामंत्री



मनोज पाल, रवी गुरुनुले, शेखर शेट्टी, उग्रसेन पांडे, सूरज ठाकूर यांच्यासह सुरक्षा रक्षकांची उपस्थिती होती. विविध मागण्यांना घेऊन सदर सुरक्षा रक्षकांनी आ. किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांची भेट घेतली होती.

सुरक्षा रक्षकांचे म्हणणे ऐकल्यानंतर आ. जोरगेवार यांनी तात्काळ या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. त्यांनी तात्काळ वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून तातडीने बैठक बोलावण्याच्या सूचना केल्या. त्यांच्या पुढाकार नंतर आज शनिवारी महाविद्यालयात अधिष्ठात्यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, सुरक्षा रक्षकांचे प्रतिनिधी, संबंधित कंत्राटदार आणि प्रशासनिक अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.

या चर्चेत संबंधित कंत्राटदाराने सुरक्षा रक्षकांचे मागील तीन महिन्यांचे थकीत वेतन ५ तासात अदा केले जाईल, असे स्पष्ट आश्वासन दिले. तसेच आगामी काळात वेतन नियत वेळेत नियमितपणे अदा करण्याची ग्वाहीही कंत्राटदाराने दिली. आ. जोरगेवार यांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेला हा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, सुरक्षा रक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी सुरक्षा रक्षकांनी आ. जोरगेवार यांचे आभार मानत, त्यांच्या प्रयत्नांमुळेच आमच्या घरात दिवाळीच्या आधी प्रकाश आला, अशी भावना व्यक्त केली.

# थोडक्यात

## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माणुसकीची दिवाळी

### पूरग्रस्तांच्या मदतीसाठी क्यू आर कोडद्वारे अधिकारी - कर्मचाऱ्यांनी केले स्वेच्छा निधी संकलन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१९, ठाणे :** यावर्षी अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह महाराष्ट्र राज्यातील अनेक भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यांना मदत करण्यासाठी म्हणून महाराष्ट्र शासनासह विविध संस्था, व्यक्ती पुढे सरसावले आहेत. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयही या मदतकार्यात क्यू आर कोडच्या माध्यमातून पुढे सरसावले आहे.

दिवाळीच्या पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रुपाली भालके, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शशिकांत गायकवाड, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, तहसिलदार रेवण लेंभे, सचिन चौधर, संदीप थोरात, अमोल कदम, प्रदिप कुडाळ, उज्वला भगत, निलेश गौड, मुकेश पाटील, जिल्हा खनिकर्म अधिकारी विवेक घुले यांच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी कार्यालय आणि सर्व प्रांत व तहसिल कार्यालय यांनी दिवाळी फराळ कार्यक्रमासोबतच एक हात पूरग्रस्तांच्या मदतीकरिता याअंतर्गत माणूसकीची दिवाळी हा उपक्रम राबविला. यावेळी अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या बँक खात्यावर क्यू आर कोडच्या माध्यमातून स्वेच्छा निधी थेट जमा केला. पहिल्याच दिवशी हा निधी जवळपास एक लाख रुपयांच्या आसपास पोहोचला. शासन आणि प्रशासन हे नेहमीच नागरिकांच्या कल्याणाकरिता अहोरात्र प्रयत्न करीत असते, त्यासाठी हे देखील कर्तव्य आणि माणुसकीच्या भावनेतून केलेले एक छोटेसे योगदान असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी म्हटले.

## शहराचा प्रकाश जंगलात, मानवतेचा दीप मनामनात



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.१९, मुंबई :** दिवाळी म्हणजे फक्त घराघरातले दिवे नाहीत, ती म्हणजे एकमेकांच्या जीवनात प्रकाश पसरवण्याची भावना. हीच भावना कृतीत उतरवून दाखवली आहे राष्ट्रीय सेवा मंडळ, लालबाग, मुंबई यांनी दि.१८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबईहून थेट लव्हाळी (ता. अंबरनाथ,जि. ठाणे) येथे येऊन आदिवासी समाजासोबत केली दिवाळी साजरी. राष्ट्रीय सेवा मंडळाचे कार्यकर्ते लांबचा प्रवास करत, डोंगरदऱ्या, पायवाटांमधून लव्हाळी येथे पोहोचले. त्यांच्या वाहनांमध्ये केवळ वस्तू नव्हत्या. तर त्या होत्या करुणेच्या गाठोड्या, संवेदनांच्या ओंजळी!लव्हाळीतील शिवभक्त अनुदानित आश्रमशाळा, येथे राष्ट्रीय सेवा मंडळाने एक आगळा उपक्रम राबवला. शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना दिवाळी आनंद किट वाटप करून, त्यांच्या चेहऱ्यावर फुलवला आनंदाचा व उत्साहाचा प्रकाश. या किटमध्ये साखर, डाळ, रवा, चहा पावडर, तेल या आवश्यक वस्तूंसोबत चकली, करंजी, लाडू, चिवडा असा पारंपारिक फराळाचा बॉक्स देण्यात आला. तसेचपिण्याच्या पाण्यासाठी बाटल्या पुरवून त्यांचा विचारपूर्वक सन्मान करण्यात आला.एकूण २०० हून अधिक किट्सचे वितरण करण्यात आले, आणि ते ही पूर्ण नियोजन, शिस्त व समन्वयातून प्रत्येक सदस्याने स्वतः हून किट योग्य हातात पोहोचेल याची ही काळजी घेतली.बालकांच्या चेहऱ्यावर आनंदाचा जल्लोष फक्त पालकांनाच नव्हे, तर आश्रमातील सर्व मुलांना ही राष्ट्रीय सेवा मंडळाने खेळण्यांचे किट दिले. बॉल, कॅरम, दोरी, क्रिकेट, फुटबॉल प्रत्येक खेळात बालमनाचा आनंद दाटला. त्यांच्या हसण्यातून जणू नाद उमटत होता. हीच खरी आमची दिवाळी.

## राष्ट्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील मयुरी खरात ने रौप्यपदक पटकावले




**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१८, पनवेल :** पोलिस हेडक्वॉटर जम्मू आणि काश्मिर श्रीनगर खेळ मंत्रालय भारत सरकार व तायक्वॉदो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित पोलिस गेम्स राष्ट्रीय तायक्वॉदो स्पर्धेत पोलो मैदान श्रीनगर जम्मू - काश्मिर येथे १० ते १४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या स्पर्धेत रायगडची कन्या मयुरी खरात नी आपल्या वेगवान खेळाने अंतिम फेरीत प्रवेश केला. पण तेथे तिला हार पत्करावी लागली. तायक्कांदो स्पर्धेत मयुरीला रौप्य पदक मिळाले. मयुरी गेली २४ ते २५ वर्षे आंतरराष्ट्रीय पंच वी ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट असलेले सुभाष पाटील यांच्या कडे तायक्वॉदो खेळाचे प्रशिक्षण घेत आहे. मयुरी ने अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदक मिळविले आहे. मयुरी च्या या विजयामुळे संपूर्ण नवी मुंबई पोलीस दलात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तिच्या या यशात सिंहाचा वाटा मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील व पोलीस प्रशिक्षक दादा माने यांचे आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मयुरी चे विशेष अभिनंदन नवी मुंबई चे पोलीस आयुक्त मिलिंद भारांबे यांनी केले.